मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# होमग्राऊंडवर अजित पवारांना मोठा धक्का!

## एक्झिट पोलचा अंदाज; भाजपाला 64, राष्ट्रवादीला 51 जागा मिळण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनीधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वाधिक लक्ष घातलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत एक्झिट पोलच्या अंदाजानुसार त्यांना धक्का बसत असल्याचे दिसत आहे. प्राबच्या अंदाजानुसार पीसीएमसीत भाजपाला सर्वाधिक ६४ जागा मिळतील तर, अजित पवारांची राष्ट्रवादी ५१ जागांपर्यंत मजल मारेल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये ३२ प्रभागातून १२८ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. या पालिकेत अजितदादांनी सर्वाधिक लक्ष घातले होते. भाजपाकडे सत्ता गेल्यापासून पालिकेत भ्रष्टाचार बोकाळला असल्याचा आरोप अजित पवारांनी केला होता. पवारांनी भोसरीचे आमदार महेश लांडगेंवर जोरदार प्रहार करत, पालिकेवर परत सत्ता मिळविण्याचा निर्धार केला होता.



**दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा फायदा नाही?**

दुसरीकडे भाजपासमोर पालिकेची सत्ता राखण्याचे आव्हान होते. अजित पवारांच्या आरोपांना भाजपने देखील जोरदार प्रत्युत्तर दिले होते. महेश लांडगेंनी अजित पवारांचा एकेरी उल्लेख करत त्यांनी केलेले आरोप फेटाळून लावले होते. पिंपरी - चिंचवडमध्ये अजित पवारांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत युती केली आहे. दरम्यान, या युतीचा त्यांना काही फायदा झाला नसल्याचे एक्झिट पोलमधून समोर आलेल्या अंदाजातून दिसत आहे. दरम्यान, हा केवळ दोनच पोल एजन्सीचा अंदाज असून, यात भाजपला सर्वाधिक जागा मिळताना दिसत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी १६ जानेवारी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. पालिका हद्दीतील निश्चित करण्यात आलेल्या ०८ ठिकाणी मतमोजणी होणार असल्याची माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रवण हर्डीकर यांनी दिली आहे.

### PRAB च्या अंदाजानुसार

- भाजप - ६४
- शिवसेना - ९
- राष्ट्रवादी - ५१
- शरद पवार गट - २
- काँग्रेस - १
- मनसे - १

### जेडीएसच्या अंदाजानुसार

- भाजप - ४७ ते ६० जागा
- राष्ट्रवादी (अजित पवार) - ४२ - ५१ जागा
- राष्ट्रवादी (शरद पवार) - ०२ -०४ जागा
- शिवसेना (उबाठा) - ०२ -०३ जागा
- मनसे - ० - ०२ जागा
- शिवसेनेला ०२ ते ०३ जागा,
- काँग्रेसला ०२ जागा
- इतर १४ - १५ जागा

# निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने पाच पोलिसांचे निलंबन

## वारंवार नोटीस देऊनही कर्तव्यावर हजर न राहिल्याने आयुक्तांची तडकाफडकी कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील पाच पोलिसांचे निलंबन करण्यात आले. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. पोलीस हवालदार संजय केळकर, सागर बाविस्कर, पोलीस शिपाई जगन्नाथ शिंदे, प्रतिभा गावडे, संतोष जाधव अशी निलंबित केलेल्या पोलिसांची नावे आहेत. हे सर्वजण पोलीस मुख्यालयात नेमणुकीस आहेत.




पिंपरी-चिंचवड मनपा निवडणुकीसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान झाले. त्यापूर्वी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळेगाव, आळंदी, चाकण नगरपरिषदांची निवडणूक झाली. आता पिंपरी-चिंचवड मनपाची निवडणूक सुरु असून या कालावधीत शहरात अनेक महत्वाचे नेते शहराचा दौरा करत आहेत. अशा कालावधीत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावला जातो. मनुष्यबळाअभावी आहे त्या मनुष्यबळावर पोलिसांना संपूर्ण कामकाज करावे लागते.

निलंबित केलेले पोलीस अंमलदार मागील काही महिन्यांपासून रजेवर गेले आहेत. त्यांना पोलीस मुख्यालयाकडून अनेक वेळेला पत्र पाठवून कर्तव्यावर हजर होण्यास सांगण्यात आले होते. मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे कारवाईचा बडगा उगारत पोलीस आयुक्तांनी पाच जणांचे तडकाफडकी निलंबन केले आहे. कर्तव्यावर हजर न राहण्याबाबत त्यांची विभागीय चौकशी सुरु राहणार असल्याचे आदेशात नमूद आहे.

# मतमोजणी सकाळी 10 वाजता सुरु होणार

## आयुक्त श्रावण हर्डीकर यांची माहिती; 8 ठिकाणी कडेकोट बंदोबस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने आज मतदान पार पडत आहे. या निवडणुकीची मतमोजणी उद्या, १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता महापालिका हद्दीतील निश्चित केलेल्या ८ ठिकाणी सुरू होणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.मतमोजणी प्रक्रियेसाठी निवडणूक विभागाने ज्या व्यक्तीला ओळखपत्र दिले आहे, अशा पात्र व्यक्तींनाच मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.



मतमोजणी केंद्र परिसरात वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था तसेच प्रसारमाध्यमांसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आलेला आहे. निकाल जाहीर करताना अचूकता व पारदर्शकता राखण्यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. प्रभाग क्रमांक १०, १४, १५ व १९ येथील मतमोजणी स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, प्राधिकरण, से.क्र. २६, निगडी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १० साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या, प्रभाग क्रमांक १४ व १९ साठी प्रत्येकी १८ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक १५ साठी मतमोजणीच्या १५ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ येथील मतमोजणी ऑटो क्लस्टर येथील छोटा हॉल, चिंचवड येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १६ व २२ साठी मतमोजणीच्या प्रत्येकी १४ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक १७ व १८ साठी प्रत्येकी १६ फेऱ्या होणार आहेत. प्रभाग क्रमांक ०२, ०६, ०८ व ०९ येथील मतमोजणी संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २ साठी मतमोजणीच्या २१ फेऱ्या, प्रभाग क्रमांक ६ साठी मतमोजणीच्या १७, प्रभाग क्रमांक ८ साठी २० फेऱ्या आणि प्रभाग क्रमांक ९ साठी मतमोजणीच्या १८ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक २५, २६, २८ व २९ येथील मतमोजणी ड क्षेत्रीय कार्यालय, औंध-रावेत बीआरटी रोड, रहाटणी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २५ व २९ साठी मतमोजणीच्या प्रत्येकी २० फेऱ्या, प्रभाग क्रमांक २६ व २८ साठी प्रत्येकी २१ फेऱ्या होणार आहेत. प्रभाग क्रमांक ०३, ०४, ०५ व ०७ येथील कबड्डी प्रशिक्षण संकुलच्या तळमजल्यावर स्ट्राँग रूम व पहिल्या मजल्यावर मतमोजणी, अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरीच्या मागे येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक ०३ साठी मतमोजणीच्या १८ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक ४, ५ व ७ साठी प्रत्येकी १६ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ येथील मतमोजणी सेक्टर १७/१९, स्पाईन रोड शेजारी, सी-१ इमारतीसमोर, घरकुल चिखली टाऊनहॉल, चिखली येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १ साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या, प्रभाग क्रमांक ११ साठी मतमोजणीच्या १६ फेऱ्या, प्रभाग क्रमांक १२ साठी मतमोजणीच्या १४ फेऱ्या आणि प्रभाग क्रमांक १३ साठी मतमोजणीच्या १५ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ येथील मतमोजणी स्व. शंकर (अण्णा) गावडे स्मृती कामगार भवन, थेरगाव येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २१ साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या, प्रभाग क्रमांक २३ साठी मतमोजणीच्या १० फेऱ्या, प्रभाग क्रमांक २४ साठी १४ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक २७ साठी मतमोजणीच्या १६ फेऱ्या होणार आहेत. प्रभाग क्रमांक २०, ३०, ३१ व ३२ येथील मतमोजणी मनपाचे कासारवाडी भाजी मंडई (दुमजली हॉल) तळमजल्यावर मतमोजणी व दुसऱ्या मजल्यावर स्ट्राँग रूम, कासारवाडी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २० साठी मतमोजणीच्या २० फेऱ्या, प्रभाग क्रमांक ३० साठी मतमोजणीच्या १६ फेऱ्या, प्रभाग क्रमांक ३१ साठी १९ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक ३२ साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या होणार आहेत.

# लोकशाहीच्या उत्सवाला पर्यावरणपूरक विविध संकल्पनांचा स्पर्श!

## महापालिकेने पर्यावरण पूरक संदेश देणारे 8 'नाविन्यपूर्ण मतदान केंद्र' केले तयार

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाहीचा उत्सव केवळ मतदानापुरता मर्यादित न राहता तो सामाजिक, पर्यावरणीय आणि नागरिकांच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरावा, या हेतूने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा अभिनव उपक्रम राबवला असून शहरात निसर्गसंवर्धन, स्वच्छता, आरोग्य आणि शाश्वत विकासाचा संदेश देणारी नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे उभारली असून पर्यावरण पूरक विचार, नागरिकांची जबाबदारी आणि लोकशाही मूल्यांचा सुंदर समन्वय साधला आहे. असे प्रतिपादन तृप्ती सांडभोर यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत एकूण ८ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात एक याप्रमाणे एकूण ८ नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. या मतदान केंद्रांची पाहणी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी आज केली तसेच पाहणीदरम्यान मतदान केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.




या नाविन्यपूर्ण मतदान केंद्रांमध्ये 'सौर ऊर्जा', 'हरित मतदान केंद्र', 'ओला व सुका कचरा वर्गीकरण', 'तंदुरुस्त रहा (STAY FIT), 'आरआरआर (REDUCE, RECYCLE, REUSE) , 'पाणी वाचवा', 'स्वच्छ हवा कृती आराखडा (GRAP – CLEAN AIR)' तसेच 'पंचतत्त्व' अशा महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश करण्यात आला आहे.या प्रत्येक नाविन्यपूर्ण मतदान केंद्रात संबंधित विषयानुसार सजावट, माहितीपर फलक व जनजागृती संदेशांच्या माध्यमातून मतदारांमध्ये पर्यावरणीय व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा उद्देश आहे.

'सौर ऊर्जा' विषयावर आधारित मतदान केंद्र न्यू पुणे पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आकुर्डी येथे साकारले असून याद्वारे सौर ऊर्जेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. तर आचार्य श्री आनंद ऋषीजी इंग्लिश मिडीयम स्कूल, चिंचवड येथे 'हरित मतदान केंद्र' बनवण्यात आले असून याद्वारे पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला गेलाय. 'ओला व सुका कचरा वर्गीकरण' या विषयातून स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले असून ही संकल्पना सावित्रीबाई फुले शाळा मोशी मतदान केंद्रावर राबवण्यात आली आहे. प्राथमिक विद्यालय जाधववाडी, चिखली या मतदान केंद्रावर 'आरआरआर' या संकल्पनेद्वारे शाश्वत विकासाचा संदेश देण्यात आला आहे. 'तंदुरुस्त रहा' या विषयातून नागरिकांना आरोग्यदायी जीवनाचा संदेश दिला गेला असून हे मतदान केंद्र जी. के. गुरुकुल स्कूल पिंपळे सौदागर येथे आहे. 'पाणी वाचवा' या विषयातून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले असून हे नाविन्यपूर्ण मतदान केंद्र जी. के. गुरुकुल स्कूल पिंपळे सौदागर येथे आहे. तर,प्रिन्स सोसायटी थेरगाव येथे साकारण्यात आलेल्या मतदान केंद्रावर 'स्वच्छ हवा कृती आराखडा (ग्रॅप)' या विषयातून स्वच्छ व निरोगी हवेचा संदेश देण्यात आला आहे तसेच स्त्री शक्ती सबलीकरण याविषयक बूथ उभारण्यात आले. मनपा विद्यालय, कासारवाडी या ठिकाणच्या 'पंचतत्त्व' या विषयातून पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश या पंचमहाभूतांचा समतोल जपण्याचा संदेश दिला गेला आहे.

मतदानाचा हक्क बजावताना पर्यावरण व समाजाप्रती असलेली जबाबदारी प्रत्येक मतदाराच्या मनात रुजावी, या उद्देशाने ही नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे उभारण्यात आलेली आहेत.

दरम्यान, पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी १५ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुणे महापालिका निवडणूक: 12 हजार पोलिसांचा कडक बंदोबस्त

## व्यापक आणि बहुस्तरीय सुरक्षा आणि प्रतिबंधात्मक कृती आराखडा राबवला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस आयुक्तालयाने शहरात मुक्त, निष्पक्ष आणि शांततामय मतदान पार पडावे, यासाठी व्यापक आणि बहुस्तरीय सुरक्षा आणि प्रतिबंधात्मक कृती आराखडा राबवला आहे. पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असून कायदा आणि सुव्यवस्था राखणे, निवडणूक गैरप्रकार रोखणे आणि निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेचा विश्वास निर्माण करणे यावर विशेष भर देण्यात आला आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत प्रतिक्रिया देताना, पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, “पुणे महापालिका निवडणूक पूर्णपणे मुक्त, निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पडावी, याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. निवडणूक काळात विशेषत: मतदानादरम्यान प्रतिबंधात्मक कारवाई, आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी आणि मजबूत देखरेख ही लोकशाही प्रक्रियेच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती, बेकायदेशीर आमिषे रोखणे आणि संवेदनशील आणि असुरक्षित भागांत कायदा तसेच सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे पोलिसांनी सक्रिय पावले उचलली आहेत. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे आणि कोणत्याही उल्लंघनाची माहिती द्यावी, जेणेकरून निवडणुका शांततेत आणि पारदर्शकपणे पार पडतील.”

शहराचे १४३ सुरक्षा विभाग करण्यात आले असून, प्रत्येक विभागावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. १०० हून अधिक संवेदनशील आणि अतिसंवेदनशील ठिकाणे ओळखण्यात आली असून, कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून तेथे गुन्हे शाखा आणि अन्य विशेष पथकांचा अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सतत नजर ठेवण्यासाठी पुणे पोलिसांनी १८ स्थिर देखरेख पथके, १५ मोबाईल देखरेख पथके आणि १५ व्हिडिओ देखरेख पथके कार्यान्वित केली आहेत. या कारवायांदरम्यान ६७ लाख रुपयांची बेहिशेबी रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, निवडणूककाळात बेकायदेशीर आमिषे व प्रभाव टाकण्याचे प्रकार रोखण्यासाठी कडक नियंत्रण ठेवण्यात येत असल्याचे यावरून स्पष्ट होते.



### निवडणूक काळात अमली पदार्थ, शस्त्र जप्त

» अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख यांनी सांगितले, “महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत १७९ गुन्हे दाखल करून १ कोटी २३ लाख रुपयांची बेकायदेशीर दारू आणि संबंधित साहित्य जप्त करण्यात आले आहे. अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (एनडीपीएस) अंतर्गत १२६ ग्रॅम एमडी, ३.९४७ किलो गांजा, ७.२८६ किलो अमली गोळ्या, २१२ गोळ्या आणि ५७.७८० ग्रॅम चरस असा एकूण २६.८४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एमपीडीए कायदा आणि अन्य तरतुदींअंतर्गतही गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.”निवडणूक काळात शस्त्रांच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी १५ अग्निशस्त्रे, १५ काडतुसे आणि २९ धारदार शस्त्रे जप्त केली आहेत. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून ३,२९४ परवाना असलेली शस्त्रे तात्पुरती जमा करून घेण्यात आली आहेत. ३१३ अजामीनपात्र वॉरंट्सची अंमलबजावणीही कडक कारवाईचे द्योतक आहे.

### पोलिसांचा फौजफाटा

» सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून १२ पोलीस उपायुक्त, ३० सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष कर्तव्यावरील सात सहाय्यक पोलीस आयुक्त, १६६ पोलीस निरीक्षक, ७२३ सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि उपनिरीक्षक, तसेच सुमारे १२,५०० पोलीस कर्मचारी प्रत्यक्ष बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय, ३,२५० होमगार्ड्स आणि राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) चार तुकड्यांची मदत घेण्यात आली आहे.

> “पुणे महापालिका निवडणूक पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पडावी, याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती, बेकायदेशीर आमिषे रोखणे आणि संवेदनशील आणि असुरक्षित भागांत कायदा तसेच सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे पोलिसांनी सक्रिय पावले उचलली आहेत.
>
> \- अमितेश कुमार, पोलीस आयुक

# अभय योजना संपताच पुणे महापालिकेच्या उत्पन्नावर प्रश्नचिन्ह

## मिळकत कर वसुलीत अपेक्षित यश नाही; नव्या नगरसेवकांसमोर आर्थिक आव्हान

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने मिळकत कर थकबाकीदारांसाठी जाहीर केलेल्या अभय योजनेची अंतिम तारीख उद्या गुरुवारी (दि 15) संपत असली तरी अपेक्षित उत्पन्नापर्यंत पोहोचण्यात महापालिकेला अपयश आले आहे. मागील दोन महिन्यांत नागरिकांकडून सुमारे 750 कोटी रुपयांचा भरणा झाला असला, तरी चालू आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकात गृहीत धरलेले 3 हजार 250 कोटी रुपयांचे उद्दिष्ट गाठणे कठीण असल्याचे स्पष्ट होत आहे.

महापालिकेने चालू वर्षात मिळकत करातून 3 हजार 250 कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित धरले होते. मात्र, आतापर्यंत जेमतेम सुमारे अडीच हजार कोटी रुपयांचेच उत्पन्न मिळाले आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अद्याप अडीच महिन्यांचा कालावधी शिल्लक असला, तरी या काळात अपेक्षित तफावत भरून निघेल का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. महापालिका प्रशासनाने 15 नोव्हेंबर 2025 ते 15 जानेवारी या कालावधीत मिळकत कर थकबाकीदारांसाठी अभय योजना लागू केली होती. या योजनेअंतर्गत थकीत मिळकत करावरील दंडाच्या रकमेत 75 टक्के सवलत देण्यात आली. मोबाईल टॉवरची थकबाकी वगळता, इतर मिळकत धारकांकडे एकूण 12 हजार 161 कोटी रुपयांची थकबाकी होती. यामध्ये मूळ कर रक्कम 3 हजार 158 कोटी रुपये, तर दंडाची रक्कम 9 हजार 2 कोटी रुपये इतकी होती.

दंडात सवलत दिल्यानंतर महापालिकेला मूळ कर आणि दंडाच्या 25 टक्के रकमेसह सुमारे 5 हजार 408 कोटी रुपये उत्पन्न मिळेल, असा अंदाज प्रशासनाने बांधला होता. अधिकाधिक थकबाकी वसुली व्हावी यासाठी रहिवासी तसेच व्यावसायिक मिळकतींना आणि यापूर्वी अभय योजनेचा लाभ घेतलेल्या मिळकत धारकांनाही या योजनेत सामावून घेण्यात आले होते.




### नवीन नगरसेवकांसमोर उत्पन्नवाढीचे मोठे आव्हान

» अभय योजना राबवूनही अपेक्षित थकबाकी वसूल न होणे, ही महापालिकेच्या आर्थिक आरोग्यासाठी चिंतेची बाब मानली जात आहे. दुबार बिलिंगमुळे प्रलंबित राहिलेली प्रकरणे, चुकीच्या आकारणीमुळे न्यायालयात अडकलेले खटले, समाविष्ट गावांतील थकबाकी वसुलीवर मागील दोन वर्षांपासून असलेली स्थगिती, तसेच मागील नऊ वर्षांपासून न झालेली करवाढ यामुळे मिळकत करातून मिळणाऱ्या उत्पन्नवाढीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. महापालिकेत नव्याने निवडून येणारे नगरसेवक आणि सत्ताधारी जर उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करण्यात अपयशी ठरले, तर निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे कठीण जाईल, असे संकेत या परिस्थितीतून मिळत आहेत.

# जुन्नर नगरपालिकेत हायव्होल्टेज ड्रामा! 10 तास कामकाज ठप्प

## सरकारी कागदपत्रांची फाडाफाड करणाऱ्या अज्ञाताचा शोध सुरू; मधुकर काजळे यांची सीसीटीव्ही फुटेजची मागणी, पोलिसांत तक्रार दाखल.

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्षपदाच्या निवडणूकीत मोठा गदारोळ झाला. या गदारोळातच कोणीतरी अज्ञाताने सभेच्या कच्च्या नोंदी असलेल्या रजिस्टरमधील (प्रोसिडिंग) फाडले, त्याची जुन्नर पोलिसांत तक्रार दाखल केली गेली.यासंदर्भात नगरपरिषदेच्या वतीने पोलीस ठाण्यात देण्यात आलेला तक्रार अर्ज बाळासाहेब भोसले सभा अधीक्षक यांनी दिला असून, या अर्जावर मुख्याधिकारी यांनी सही केलेली आहे.

प्रोसिडींग फाडणाऱ्या अज्ञाताचा शोध घेऊन त्याच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या घटनेप्रसंगीचे सीसीटीव्ही फूटेज देण्याची मागणी माजी नगरसेवक मधुकर काजळे यांनी मुख्याधिकारी यांना पत्राद्वारे केली आहे. सीसीटीव्ही फुटेज सोबत मीनीटस बुकच्या कॉपी देखील मिळाव्यात असेही त्यांनी पुढे म्हटले आहे.दरम्यान, उपनगराध्यक्ष पदाकरिता अलका फुलपगार व रूपाली परदेशी यांनी आपले अर्ज दाखल केले होते.

परंतु, फुलपगार यांच्या अवैध बांधकामाबाबत आक्षेप घेण्यात आल्यानंतर त्यांचा अर्ज पिठासीन अधिकारी यांनी बाद केल्यानंतर सभागृहात मोठा गोंधळ सुरू झाला. रात्री उशिरारपर्यंत चाललेल्या ह्या नाट्यमय घडामोडीमुळे नगरपालिकेत सुमारे दहा तास कामकाज ठप्प होते. रात्री उशिरा पिठासीन अधिकारी सुजाता काजळे यांनी रूपाली परदेशी यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले.

तसेच स्वीकृत नगरसेवक पदाकरिता राष्ट्रवादी कॉंग्रेसने शिफारस केलेले लक्ष्मीकांत कुंभार यांची निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी यांनी जाहीर केले. तसेच शिवसेना शिंदे घटना शिफारस केलेले जमीर कागदी यांच्यावरील निर्णय त्यांनी राखून ठेवला. २० नगरसेवकांच्या सभागृहात केवळ एक नगरसेवक असलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या नगरसेविका रूपाली परदेशी यांची उपनगराध्यक्षपदी झालेली निवड सर्वांनाच धक्का देणारी ठरली होती.

परिणामी झालेल्या गदारोळामुळे नगरपालिका परिसरात विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे या भागात काही वेळ तणाव निर्माण झालेला होता. मोठ्या संख्येने असलेल्या पोलीस बंदोबस्तामुळे व मोठ्या प्रमाणात पोलिसांची कुमक दाखल झाल्याने या परिसरात छावणीचे स्वरुप प्राप्त झाले होते. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार यावेळी घडला नाही.




### प्रोसिडींग फाडल्याची तक्रार

» मंगळवार (दि.१३) रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कच्च्या नोंदी रजिस्टरमध्ये घेण्यात आलेल्या होत्या. त्याचा अहवाल तयार करण्यासाठी हे रजिस्टर पहिल्या मजल्यावर सायंकाळी आणण्यात आले. हे अहवाल तयार करण्याचे काम सुरू असताना काही नगरसेवकांनी रजिस्टरची मागणी केली होती. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने इतिवृत्तातील पाने फाडली असून, याला जबाबदार असणाऱ्यावर कारवाई करण्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

> “या प्रकाराबाबत जिल्हाधिकाऱ्यांना माहीती देण्यात आली आहे. उपनगराध्यक्षपदाच्या निवडीबाबत त्यांच्याकडून आलेल्या निर्देशानुसार पुढील निर्णय होईल.”
>
> \- गोविंद शिंदे, प्रांताधिकारी

> “तक्रार अर्ज आलेला आहे. परंतु, योग्य पद्धतीने दिला गेला नसल्याने सक्षम अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासणी केल्यानंतर संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.”
>
> \- किरण अवचर,
> पोलीस निरीक्षक, जुन्नर

> “यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीसाठी गेलेलो असल्याने सदर प्रकरणाची सर्व तांत्रिक शहानिशा करून माहिती देण्यात येईल.”
>
> \- चरण कोल्हे, मुख्याधिकारी

# बारामतीत 6 गट अन् 12 गणांसाठी ‘रणधुमाळी’; अर्ज स्वीकारण्यास सुरुवात

## निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली माहिती; 2 लाख 64 हजार मतदार बजावणार हक्क, 299 मतदान केंद्रांवर होणार मतदान.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे बारामती तालुक्याकरिता जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. गुरूवार (दि.१६) जानेवारीपासून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. नामनिर्देशनपत्रे ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत.

अशी माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी तहसील कार्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील रावडे, गटविकास अधिकारी किशोर माने आदी उपस्थित होते. नावडकर म्हणाले, बारामती तालुक्यात जिल्हा परिषदेचे सुपा, गुनवडी, पणदरे, वडगाव निंबाळकर, निंबूत आणि निरावागज असे एकूण ६ गट तर पंचायत समितीचे सुपा, काऱ्हाटी, शिर्सुफळ, गुणवडी, पणदरे, मुढाळे, मोरगाव, वडगाव निबांळकर, निंबुत, कांबळेश्वर, निरावागज, डोर्लेवाडी, असे एकूण १२ गण आहेत. पुरुष मतदार १ लाख ३५ हजार ७३, महिला मतदार १ लाख २९ हजार ५६० आणि इतर ९ असे मिळून २ लाख ६४ हजार ६४२ इतकी आहे. मतदान केंद्र २९९ आहेत. उमेदवाकरिता खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदेसाठी ९ लाख रुपये तर पंचायत समितीकरिता ६ लाख रुपये आहे.

परवानग्याबाबत तहसील कार्यालय आदर्श आचारसंहिता कक्षामध्ये एक खिडकी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. एका उमेदवाराला ४ अर्ज दाखल करता येईल. निवडणुकीची मतमोजणी जिल्हा क्रीडा संकुलामधील बॅडमिटंन हॉलमध्ये होणार आहे. राजकीय पक्षासोबत प्रतिनिधीची बैठक घेवून सूचना देण्यात आल्या आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे बारामती तालुक्याकरिता जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.




### एक खिडकी यंत्रणा कार्यान्वित

» परवानग्याबाबत तहसील कार्यालय आदर्श आचारसंहिता कक्षामध्ये एक खिडकी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. एका उमेदवाराला ४ अर्ज दाखल करता येईल. निवडणुकीची मतमोजणी जिल्हा क्रीडा संकुलामधील बॅडमिटंन हॉलमध्ये होणार आहे. राजकीय पक्षासोबत प्रतिनिधीची बैठक घेवून सूचना देण्यात आल्या आहे.